शिवाजी विद्यापीठाचा क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचा सखोल अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

यांस पीएच.डी.पदवीसाठी सादर केलेला आराखडा

संशोधक

श्री.तानाजी रामदास साबळे

मार्गदर्शक

डॉ.साहेब गंगाराम मोरे

वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी नांदेड

फेब्रुवारी 2018

1.1 प्रस्तावनाः

महाराष्ट्र हे एक पुरोगामी राज्य असून महाराष्ट्राच्या सर्वांगीन विकासात शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. इंग्रजांनी **1857** मध्ये स्थापन केलेल्या पहिल्या **3** विद्यापीठांमध्ये महाराष्ट्रातील मुंबई विद्यापीठाचा समावेश होतो.

स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रात विशेषतः **1** मे **1960** नंतरच्या संयुक्त महाराष्ट्रात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेने व पुढाकाराने जी विद्यापीठे स्थापन झाली त्यातील महाराष्ट्राचे आराध्य असलेल्या छत्रपती शिवरायांच्या नावे **1962** मध्ये स्थापन झालेल्या शिवाजी विद्यापीठ□कोल्हापूरचा समावेश होतो. या विद्यापीठाला प्रत्यक्षात उतरविण्यासाठी लोकनेते बाळासाहेब देसाई□डॉ. सी. रा. तावडे आणि डॉ. आप्पासाहेब पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

भारताचे तत्कालीन राष्ट्रपती व थोर विचारवंत व तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते **18** नोव्हेंबर **1962** रोजी शिवाजी विद्यापीठाची विधीवत स्थापना झाली. या विद्यापीठाने पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर□सोलापूर□सांगली व सातारा या जिल्हयांमध्ये आपले शिक्षणाचे कार्य सुरू केले.

विद्यापीठाचे पहिले कुलुगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच ग्रामीण भाागातला हा विद्यार्थी मन□मनगट आणि मेंदू यांच्या जोरावरच यशस्वी होऊ शकतो हे ओळखून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकाराच्या दृष्टिकोनातून कमवा आणि शिका ही अभिनव योजना सूरू केली. त्याचबरोबर विद्यापीठामध्ये विविध अधिविभागांची स्थापना करून त्या त्या अधिविभागाच्या विविध उप□मांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील कला□□डा व सुप्तगुणांच्या वाढीस प्रेरणा दिली.

आज शिवाजी विद्यापीठ हे देशातील अग्रगण्य विद्यापीठांपैकी एक असून **3.16** इतक्या गुणांकनासह नॅकचा राज्यातील अग्रमानांकीत अ दर्जा **2016** साली मानव संसाधन विकास मंत्रालय□भारत सरकार यांच्या व्दारे आयोजित पहिल्या नॅशनल इंन्सिटयुशनल रॅकींग फेमवर्क □एन. आय. आर. एफ. □ □मवारीत शिवाजी विद्यापीठाचा देशातील **550** विद्यापीठांमध्ये देशात **28** वा व राज्यात पहिला □मांक लागतो. नुकत्याच अमेरिकेतील एका संस्थेने जाहीर केलेल्या बेस्ट ग्लोबल युनिव्हर्सिटीमध्ये शिवाजी विद्यापीठाचा **21** वा □मांक लागतो. साहजिकचा विद्यापीठाच्या या यशस्वी वाटचालीत विद्यापीठाच्या □डा विभागाचा विशेष असा वाटा आहे.

शिवाजी विद्यापीठाध्ये विद्यापीठाच्या स्थापना वर्षापासुनच □डा कामकाजाला सुरूवात झाली. तथापि विद्यापीठातील □डा विभागाची स्थापना **1991** मध्ये झाली. अगदी स्थापनेपासून शिवाजी

विद्यापीठाच्या □डाविभागाने विविध देशी विदेशी कीडाप्रकारात आपला सहभाग नोंदविलेला दिसतो. व यातूनच ऑलंपिक □लंडन□खेळाडू वीरधवल खाडे□कु. राही सरनौबत जागतिक सुवर्णपदक विजेती नेमबाज□कॉमनवेल्थ गेममधील सुवर्णपदक विजेता भारत्तोलक अमित निंबाळकर□नेहांकीता वरूटे चायना येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठीय ॲथलेटिक्स स्पर्धेमधील खेळाडू दीपक कुंभार□जयश्री बोरगी तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे नेमबाज कन्हैया बाबर व राधिका बरळे यासारखे खेळाडू विद्यापीठाच्या □डाविभागाने देशाला दिले आहेत.

विद्यापीठाने □डाविभागाला चालना देण्यासाठी आपल्या सर्वच्या सर्व म्हणजेच **279** महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र □डाविभाग□नियमित शारीरिक शिक्षण संचालक तसेच सक्तीच्या शारीरिक शिक्षण परीक्षेची तजवीज केलेली आहे. तसेच आपल्या कार्यक्षेत्रात शारीरिक शिक्षण महाविद्यालयेही स्वतंत्रपणे सुरू केलेली आढळतात. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे शिवाजी विद्यापीठाच्या कीडा विभागाने गेल्या **5** वर्षात ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेमध्ये विविध □डाप्रकारात **71** सुवर्ण□**43** रजत आणि **40** कास्य अशी एकुण **154** पदके प्राप्त केलेली आहेत. तसेच महाराष्ट्र राज्याच्या □डामंत्रालयातर्फे आयोजित केल्या जाणा□या अश्वमेध □डामहोत्सवात **67** सुवर्ण□**38** रजत आणि **41** कांस्य अशी एकूण **146** पदकांची कमाई केलेली आहे.

पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागातील □डा नैपुण्याचा विकास घडवून आणून या गामीण विभागातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पातळीवरचे व्यासपीठ मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य विद्यापीठाच्या □डाविभागाने सातत्यपूर्णतेने केलेले दिसून येते. तसेच या ग्रामीण विभागात विविध देशी व विदेशी□ पारंपरिक व आधुनिक □डाप्रकारांचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य विद्यापीठाच्या □डाविभागाने केलेले आहे. सातारा□सांगली□कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्हयांमध्ये विविध खेळांची रूजवणूक करण्यामध्ये विद्यापीठाच्या □डाविभागाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिलेले आहे.

अशा या विद्यापीठाच्या □डाविभागाची □डाक्षेत्रातील योगदानाची दखल संशोधनात्मक पातळीवर गरजचे वाटते म्हणून प्रस्तुत संशोधकाने हा विषय अभ्यासण्याचे योजिले आहे.

1.2 संशोधन समस्या ः

शिवाजी विद्यापीठाच्या □डाविभागाच्या सहभागाचा सखोल अभ्यास

1.3 समस्येचे स्पष्टीकरण ः

शिवाजी विद्यापीठाचा शैक्षणिक आलेख हा विद्यापीठाच्या स्थापनेपासून सातत्यपूर्ण रितीने उंचावत गेल्याचे दिसून येते. या शैक्षणिक आलेखाचा लेखाजोखा नॅक मानांकन□एन.आय. आर. एफ. तसेच बेस्ट ग्लोबल रॅकींगव्दारे सिध्द झालेला आहे. **1991** मध्ये विद्यापीठात स्थापित झालेल्या □डाविभागाने विद्यापीठाच्या वाटचालीत मोलाचे योगदान दिलेले आहे. तथापि □डाविभागाच्या योगदानाचे उचित मूल्यमापन स्वतंत्रपणे होण्याची आवश्यकता भासल्याने व भविष्यात विद्यापीठ पातळीवर विविध खेळातील राष्ट्रीय□आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविण्याविषयक रूपरेषा वा आराखडा गरजेचा असल्याने प्रस्तूत विषयात संशोधनाची गरज वाटते. या संशोधनातून विद्यापीठाला आपल्या □डाविभागाचा पथदर्शी आराखडा□रोडमॅप□ बनविण्यासाठी निश्चितपणे काहीएक मौलिक उपयोग होईल या अपेक्षेने सदर संशोधन विषय संशोधकाने हाती घ्यावयाचा ठरविले आहे.

1.4 गरज आणि महत्त्व ः

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासुन आत्तापर्यतंचा सखोल अभ्यास पश्चिम विभागीय व ऑल इंडिया स्तरावरील □डा सहभाग व त्यामध्ये मिळवलेले यशापयश याची कारणमीमांसा व विश्लेषण सदर अभ्यासातून करता येवू शकेल. या कालावधीत विद्यापीठाने पश्चिम विभागीय व ऑल इंडिया पातळीवर ज्या ज्या □डा प्रकारात आपला सहभाग नोंदविला त्या सहभागी खेळाडूंची निवड व प्रशिक्षण यासाठी विभागीय व आंतरविभागीय पातळीवर केलेले नियोजन याचाही अभ्यास या संशोधनातून होईल व या खेळाडूंच्या एकूणच निवड प्रि□येत असणा□या उणे अधिक बाबींची पडताळणी होईल. या अभ्यासातून एकूणच □डा विभागाच्या मॅकेनिझमचा जवळून अभ्यास करता येईल. या अभ्यासातून हाती येणारे निष्कर्ष हे विद्यापीठाच्या □डा विभागाला पुढील वाटचालीसाठी दिशादर्शक ठरतील. ज्या खेळांमध्ये विद्यापीठाच्या □डा विभागाने नेत्रदिपक कामगिरी केलेली आहे. त्या नेत्रदिपक कामगिरीच्या यशाचे गमक सदर संशोधनातून हाती गवसण्याची शक्यता आहे. तसेच ज्या □डा प्रकारात विद्यापीठाला नेत्रदिपक यश संपादन करता आले नाही त्याचीही कारणमीमांसा व विश्लेषण करण्याचा मानस सदर

संशोधन कार्यामध्ये अपेक्षित आहे. ज्यामुळे □डा विभागातील राहिलेल्या उणिवांवर मात करणे शक्य होईल.

एकूणच या कालावधीतील शिवाजी विद्यापीठाच्या □डा विभागातील उणे अधिक बाबींची वास्तविक कारणमीमांसा व विश्लेषण करून त्यातून हाती येणा□या निष्कर्षाद्वारे विभागाच्या भविष्यातील वाटचालीचा पथदर्शक आराखडा बनविण्यास उपकारक ठरतील अशा काही नाविन्यपूर्ण तथ्यांची मांडणी सदर संशोधनातून करता येईल.

1.5 संशोधनाची उद्दिष्टये :

1. शिवाजी विद्यापीठाच्या □डा विभागामार्फत खेळवल्या जाणा□या विविध □डा प्रकारांचा अभ्यास करणे.
2. शिवाजी विद्यापीठाच्या मेघनाथ नागेशकर जनरल चॅम्पीयनशिप मिळविलेल्या महाविद्यालयांच्या □डा कारकिर्दीचा आढावा घेणे.
3. सातारा□सांगली व कोल्हापूर जिल्हयातील विभागीय व आंतरविभागीय □डा स्पर्धांचा आढावा घेणे.
4. शिवाजी विद्यापीठाच्या अश्वमेध पातळीवरील □डा सहभागाच्या कारकिर्दीचा आढावा घेणे.
5. शिवाजी विद्यापीठाच्या पश्चिम विभागीय पातळीवरील □डा सहभागाच्या कारकिर्दीचा आढावा घेणे.
6. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय पातळीवरील □डा सहभागाच्या कारकिर्दीचा आढावा घेणे.
7. शिवाजी विद्यापीठाच्या □डा विभागाने घडविलेल्या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या कारकिर्दीचा आढावा घेणे.
8. शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंना मिळालेले शिवछत्रपती□दादोजी कोंडदेव पुरस्कारांचा आढावा घेणे.

1.6 गृहितके :

1. महाराष्ट्राच्या □डा विकासात शिवाजी विद्यापीठाने महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

2. ग्रामीण महाविद्यालयांच्या माध्यमातून खेळ संस्कृतीचे संवर्धन होत आहे.

3. महिला खेळाडूंना खेळास पोषक वातावरण उपलब्ध झाले आहे.

4. खेळामुळे मुलांचे शारीरिक आरोग्य सुधारत आहे.

1.7 संशोधनाच्या मर्यादा :

शिवाजी विद्यापीठाने पश्चिम विभागीय व अखिल भारतीय विद्यापीठ पातळीवर सांघिक खेळ प्रकारात केलेल्या कामगिरीचा अभ्यास यावर पामुख्याने भर दिला जाणार आहे. यासाठी विद्यापीठाच्या काही निवडक महाविद्यालयांच्या □डा सहभागाचा अभ्यास केला जाणार आहे.

1.8 संशोधनाची कार्यपद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाणार आहे. त्याचबरोबर आवश्यक तेथे व्यक्ती अभ्यास पध्दतीचाही अवलंब केला जाणार आहे. त्याकरिता संबंधित खेळाडूंच्या व मार्गदर्शकांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहेत. तसेच शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित निवडक महाविद्यालयांना भेटी दिल्या जाणार आहेत.

1.9 माहिती संकलनाची साधने :

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या □डाविभागातील नोंदी व सदर विभागाचे वार्षिक अहवाल याद्वारे संकलित कली जाणार आहे. तसेच विद्यापीठाशी सलग्न असणा□ विविध महाविद्यालयाच्या □डा विभागातूनही सदर संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती प्राप्त केली जाणार आहे. शिवाजी विद्यापीठांतर्गत विभागीय व आंतरविभागीय स्पर्धा आयोजनांचे अहवाल व नोंदी याद्वारे विभागीय व आंतरविभागीय पातळीवरील स्पर्धांची माहिती संकलित केली

जाणार आहे. तसेच माहिती संकलनाचे एक महत्त्वपूर्ण तंत्र म्हणून मुलाखत तंत्रांचा वापर केला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने विद्यापीठ क्रीडाविभागाचे संचालक, शिवछत्रपती पुरस्कार व दादोजी कोंडदेव पुरस्कार प्राप्त खेळाडू तसेच मार्गदर्शक, विद्यापीठातून घडले गेलेले राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू यांचा समावेश असणार आहे. प्रस्तुत संशोधन विषयानुंगाने विविध विद्यापीठांमध्ये सादर झालेले एम.फिल. व पीएच.डी.पदवीसाठीचे शोधप्रबंध यांचाही संशोधन साधन म्हणून वापर केला जाणार आहे.

1.10 प्रकरणांची रूपरेषा ः

सदरचा संशोधन अभ्यास हा साधारणतः खालीलप्रमाणे सहा प्रकरणातून मांडला जाणार आहे.

प्रकरण 1 ः प्रस्तावनाः

या प्रकरणामध्ये संशोधनाची पार्श्वभूमी, संशोधन समस्येचे स्पष्टीकरण, संशोधनाची गरज व महत्त्व, संशोधनाची उद्दीष्टे, संशोधनाची गृहीतके, व संशोधन मर्यादा इत्यादींचा समावेश करण्यात येईल.

प्रकरण 2 ः संदर्भ साहित्याचा आढावाः

या प्रकरणामध्ये संशोधन अभ्यासाशी संबंधित पूर्वसंशोधनांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण 3 ः शिवाजी विद्यापीठाच्या विभागीय व आंतरविभागीय व इतर स्पर्धांचा आढावा

प्रकरण 4 ः शिवाजी विद्यापीठाचे क्रीडाक्षेत्रातील प्राविण्य व प्राविण्यप्राप्त खेळाडू

प्रकरण 5 ः शिवाजी विद्यापीठाची क्रीडाक्षेत्रातील कामगिरी

प्रकरण 6 ः सारांश, निष्कर्ष व शिफारशी

1.11 संदर्भ ः

The Olympic Games : The First Thousand Years, Finley, M. I., Mineola, N.Y. : Dover Publications, 2012

The Kingfisher Soccer Encyclopaedia, Gifford, Clive, Kingfisher, 2016

Managing Organizations for Sport and Physical Activity, Chelladurai, P., Scottsdale, Ariz.: Holcomb Hathaway Publishers, 2014

Human Movement: An Introductory Text, Trew, M., & Everett, T., Edinburgh: Elsevier, 2010

Sports Training Principles, Dick, F.W., London: A & C Black, 2007

Norms for Fitness, Performance, and Health, Jay Hoffman, Human Kinetics, 2006

Applied Book Composition Assessment, Vivian H. Heyward, Human Kinetics, 2004

संशोधक

श्री . तानाजी रामदास सावळे

मार्गदर्शक

डॉ . साहेब गंगाराम मोरे